
# अनुभव गैरव्यवस्थापनाचा, अयोग्य मनोवृत्तीचा

## किस्से 'सर्किट हाऊस'बद्दलचे

- अशा ठिकाणी बसावे, की कोणी म्हणू नये 'ऊठ'
- या म्हणीचा पौराणिक आदर्श म्हणजे ध्रुव
- पण, अशाही जागा आहेत, की तेथून ध्रुवालाही उठून जावेसे वाटेल

### जयंत नारळीकर



काही वर्षांपूर्वीची हकिगत. मी गढवाल येथील हेमवतीनंदन बहुगुणा विद्यापीठात एका परिसंवादासाठी गेलो होतो. बाहेरगावच्या प्रतिनिधींची सोय विद्यापीठाच्या अभ्यागत निवासात केली होती. मला मात्र सर्किट हाउसमधला 'व्हीआयपी' सेट दिला होता. सर्किट हाउस किंवा तत्सम शासकीय अभ्यागत निवासात उतरायला मी कचरतो. कारण आयत्या वेळी कुणीही शासकीय अधिकारी तेथे उगवला, तर त्याला निवासाचा अग्रक्रम असतो. अशा वेळी तुमचे (तुम्ही 'शासकीय' सदरात बसत नसलात तर) तेथून उच्चाटन होऊ शकते. मी माझी शंका माझ्या विद्यापीठातल्या यजमानांना सांगितली तेव्हा ते म्हणाले, "सर, काळजी करू नका! मी स्वतः कलेक्टर साहेबांना भेटून त्यांची लेखी परवानगी आणली आहे." मग मी निःशंक मनाने सकाळची न्याहारी घेऊन परिसंवादाला गेलो. दुपारी तेथून परत आल्यावर माझ्या खोलीकडे गेलो. माझ्याकडील किल्लीने कुलूप काढून आत गेलो, तर मला आश्चर्याचा धक्का बसला. खोलीतले माझे सामान नाहीसे झाले असून तिथे वेगळ्याच बॅगा, कपडे आदी होते. मी चुकून दुसऱ्या खोलीत तर शिरलो नाही? बाहेर येऊन खात्री केली, हीच खोली मला दिली होती. शिवाय माझ्या किल्लीने नाही का कुलूप उघडले?

ज्याने मला खोली उघडून दिली होती, त्या सर्किट हाउसच्या कर्मचाऱ्याला मी गाठले. तो म्हणाला, "साहेब मी तुमचीच वाट पाहात होतो. सकाळी नंतर शेजारच्या जिल्ह्यातील जिलाधीश सहपरिवार आले व त्यांना 'व्हीआयपी' सेट हवा होता... तुमची सोय आता इकडे खोली नंबर १०२ मध्ये केलीय." मला १०२ मध्ये माझे सामान सापडले. मी माझ्या यजमानांना फोन केला. ते ताबडतोब तेथे आले. आकांडतांडव करून मला त्यांना अडचणीत आणायचे नव्हते. पण मी त्यांना विनंती केली, "कृपा करून मला इथून तुमच्या अभ्यागत निवासात तरी न्या; नाहीतर माझ्या खर्चाने प्रायव्हेट हॉटेलात ठेवा. उद्या उपजिलाधीश आले, तर मला १०२ पण सोडावी लागेल." त्यांनी माझी सोय विद्यापीठात केली.

शासन व्यवहार कोशात इंग्रजीतल्या 'गव्हर्नमेंट सर्व्हंट'चे भाषांतर 'सरकारी कर्मचारी' आहे. मला वाटते, हा ब्रिटिश जमान्यातला शब्द व्यवहारातून काढून टाकावा. कारण 'सर्व्हंट' केव्हाच 'मास्टर' बनले आहेत.

मात्र, प्रत्येक वेळी मी पडते घेत नाही! एकदा मला मुझफ्फरपूर येथील विद्यापीठाचे आमंत्रण आले. मी आणि माझे एक ज्येष्ठ सहकारी, प्राध्यापक टंडन बिहारला गेलो. या वेळी मला बिहारच्या राज्यपालांनी त्यांचा खास पाहुणा केले व पाटण्यात आम्ही दोघे राजभवनात उतरलो. दुसऱ्या दिवशी स्टेट गेस्ट म्हणून आम्हाला पोलिस जीप (- जी हिंदी सिनेमात शेवटी नेहमी उशिरा पोचते तसली) च्या संरक्षणात मुझफ्फरपूरला पाठवण्यात आले. माझी सोय (हाय राम!) तेथील सर्किट हाउसमध्ये केली होती. टंडन आणि मी शेजार-शेजारच्या खोल्यांत होतो. आमचे विद्यापीठातले यजमान आमचे रात्रीचे जेवण नीट झाले याची खात्री करून घरी गेले. साडेदहाला आम्ही झोपायला गेलो. मध्यरात्री बाहेर बोलण्याचालण्याचा आवाज आला. कोणी तरी बडी आसामी आली होती. थोड्या वेळाने माझ्या खोलीवर टकटक झाले. सर्किट हाउसचा नियंत्रक होता. माजी (औट घटकेचे) पंतप्रधान चंद्रशेखर आले होते. त्यांची सर्किट हाउसमध्ये सोय झाली होती. पण त्यांच्या सिक्युरिटीच्या लोकांना झोपायला खोली नव्हती. जर टंडनसाहेब माझ्या खोलीत झोपायला आले, तर त्यांची खोली सिक्युरिटीवाल्यांना देता येईल. त्या गृहस्थाशी आणखी बोलून मला कळले, की सर्किट हाउसकडे आणखी खोल्या होत्या, पण त्या इतक्या 'टॉप' नव्हत्या. मी स्पष्ट शब्दांत नकार दिला. 'आम्ही दोघे राज्यपालांचे पाहुणे आणि 'स्टेट गेस्ट' आहोत, आम्हाला तुम्ही असे हलवू शकत नाही.' हे ऐकून मग त्यांनी आम्हाला त्रास दिला नाही. मला नंतर सुचले, मी त्यांना विचारायला हवे होते, "व्हीआयपी झोपले असताना सिक्युरिटीचे लोक जागे नकोत का? त्यांना झोपायला खोली कशाला पाहिजे?"



अशा ठिकाणी बसावे, की कोणी म्हणू नये 'ऊठ', ही म्हण लहानपणी मी आईकडून ऐकली. ही म्हण सार्थ करणारा आपला पौराणिक आदर्श म्हणजे ध्रुव! पण आता मी अशी काही ठिकाणे सांगतो जिथे बसल्यावर लगेच उठून जावेसे वाटेल, अगदी ध्रुवाला देखील.

महाराष्ट्रातल्या एका विद्यापीठात मी व्याख्यानांसाठी गेलो होतो. विद्यापीठातल्या प्राध्यापकांनी मी ट्रेनमधून उतरल्यावर अभिमानाने सांगितले, "गेल्या वेळी विद्यापीठ आवारात अभ्यागतांना राहण्याची सोय उपलब्ध नसल्याने आपली सोय गावातल्या हॉटेलात करावी लागली होती. आता विद्यापीठाचे अभ्यागत निवास नुकतेच बांधून झाले आहे. तेथे आपली सोय केली आहे." खरेच विद्यापीठाच्या शांत आसमंतात मोकळ्या हवेत ट्रॅफिकपासून लांब परिसरात राहणे मला निश्चितच आवडले असते. अभ्यागत निवासाची इमारत दुरून आकर्षक वाटत होती.

पण मला दिलेल्या खोलीचे दार उघडल्यावर आत शिरताना मला एक मोठी घूस टेबलावरून खिडकीत उडी मारून दारांच्या फटीतून बाहेर पसार होताना दिसली. खिडक्या-दारे यांच्या खाली मोठ्या फटी बांधकामाचा दर्जा दर्शवीत होत्या. पण मला काळजी होती, की बाहेर गेलेली घूस आतही येऊ शकते आणि तिच्या पाठोपाठ बेडूक, किडे, सापही! पावसाळा नसल्याने बेडूक नव्हते हे नशीब. पण बाथरूममध्ये कोळ्याची जाळी, कचरा, किडे भरपूर होते. मी कुठून तरी एक बादली आणि केरसुणी मिळवून बाथरूम स्वच्छ केली. संध्याकाळी दिवेलागणीच्या सुमारास ट्यूबलाईट स्वीच दाबून थांबलो तरी पेटेना. असे समजले की व्होल्टेज कमी असल्यामुळे स्वीच ३०-४० मिनिटे चालू ठेवल्यास ट्यूब जिवंत होईल... तेही कधीकधीच. हे जर माहीत होते, तर ट्यूबलाईट ऐवजी साधे बल्ब का लावले नाहीत, हा प्रश्न मनात डोकावला. कपडे ठेवायला तर वॉर्डरोब होती, पण टांगायला हँगर नव्हते. बिछान्यावर पांघरायला खरखरीत कंबल होते, पण त्याचा प्रत्यक्ष स्पर्श टाळायला आवश्यक असलेली पांघरुणाखालीच चादर नव्हती.

खोलीला पडदे नव्हते. तळमजल्यावर असल्याने बाहेरून कोणालाही आतले दिसत असे आणि आतून बाहेर पाहणाऱ्याला इमारतीसमोरचा प्लास्टिकमय कचरा दिसावा, अशी सोय होती.

पुण्याला परतल्यावर मी कुलगुरूंना या सर्व दोषांचा पाढा वाचणारे सविस्तर पत्र लिहिले. त्यांचे उत्तर आले, तेव्हा कोरडी शासकीय दिलगिरी म्हणजे काय प्रकार असतो, याचा मला अनुभव आला.

दुसरा सांगण्याजोगा अनुभव म्हणजे औरंगाबादच्या सुभेदारी गेस्टहाउसचा. प्रशस्त आवारात वृक्षांच्या सान्निध्यात इथल्या इमारती पाहिल्या की प्रथमदर्शनी मत अनुकूल होते. मुख्यमंत्री आणखी इतर 'व्हीव्हीआयपी' इथे येतात तेव्हा इथली निगा चांगलीच असणार, पण सामान्यांसाठी नाही याचा प्रत्यय येतो. बिछान्यावरच्या चादरी स्वच्छ नव्हत्या. टॉवेल वापरलेले, डागाळलेले. आम्ही तिथल्या कर्मचाऱ्याला विचारले तेव्हा त्याने कबूल केले, की त्यांच्याकडे पुरेशा चादरी, टॉवेल धुऊन मिळत नसल्याने वापरलेलेच 'रिसायकल' करतात! मी आणि माझी पत्नी आता कुठे कशी बडदास्त असेल याची थोडीफार पूर्वकल्पना मनात बाळगून आमच्या चादरी व टॉवेल घेऊन आलो होतो. म्हणून निभावलो आणि मुख्यमंत्री तेथे येण्याचा फायदाही अनुभवायला मिळाला. त्या सकाळी मुख्यमंत्री येऊन जाणार होते म्हणून आम्हा सामान्यांना आमची वाहने, टॅक्सी वगैरे परिसरातून बाहेर काढायला सांगण्यात आले.

या टीकेचा अर्थ असा नव्हे, की मला पंचतारांकित सोयी हव्यात. माफक दरात, साध्या आणि शांत वातावरणात स्वच्छ निवासव्यवस्था पुरवणे काही निवडक संस्थांना जमले आहे. ज्यांना जमत नाही ते 'पैशांचा अभाव' ही सबब दाखवून कानावर हात ठेवतात. वास्तविक अभाव असतो व्यवस्थापनाचा आणि योग्य मनोवृत्तीचा.

या अभावामुळे आपल्याला वाटते की अशा ठिकाणी बसू नये, जिथे स्वतःलाच म्हणावेसे वाटेल 'ऊठ'.

(लेखक ज्येष्ठ शास्त्रज्ञ आहेत.)


## उद्याच्या अंकात

**प्रश्न जवानांच्या वेतनाचा..**

सैन्यदलांच्या वेतनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे.. आर. आर. पळसोकर यांचा लेख